**CNR No. MHLA-05-000791-2018**

दिवाळखोरी अर्ज क्र.१/२०१८
गजानन व इतर -वि.- बॅक मॅनेजर उस्मानाबाद व ईतर

**<u>नि.क्र.१५ वर आदेश</u>**
**(दि.०१/०७/२०१९)**

गैरअर्जदार क्र.१ ने सदरच्या प्रकरणात त्याचा लेखी जबाब सादर करण्याकरीता परवानगी मागीतली आहे. गैरअर्जदार क्र.१ च्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, गैरअर्जदार क्रं.१ हा त्याचा लेखी जबाब मुदतीच्या आत सादर करू शकला नाही. परंतु, त्याला लेखी जबाब सादर करण्याची परवाणगी न दिल्यास त्याचे नुकसान होईल. पुढे त्यांनी अशी विनंती केली की, त्याचा अर्ज मंजूर करण्यात यावा.

२) अर्जदाराच्या वकिलांनी सदरच्या अर्जावर त्यांचा असा आक्षेप नोंदविला की, सदरचा लेखी जबाब हा मुदतीच्या आत सादर केला नाही म्हणुन अर्ज नामंजुर करण्यात यावा.

३) सदर अर्जाचे अवलोकन केले असता सदरचा अर्ज दिवाळखोरीकरीता दाखल केला आहे. गैरअर्जदार क्रं.१ चा अर्ज मंजूर केल्यास अर्जदाराचे कोणतेही नुकसान होणार नाही कारण सदरचे प्रकरण हे अदयाप पुराव्याकरीता लागलेले नाही. गैरअर्जदार क्रं.१ चा लेखी जबाब अभिलेखावर घेतल्यास अर्जदार व गैरअर्जदार यांच्यात असलेला मूळ वाद हा पुराव्याच्या आधारे न्यायालयासमक्ष येईल व सदरचा अर्ज हा निकाली काढतांना न्यायालयास मदत होईल. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्ज मंजूर करण्यात येतो.

अहमदपूर.
दिनांक : ०१/०७/२०१९

(अ.रा.सुर्वे)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
अहमदपूर.

Certified that PDF copy of Order supra is word-to-word identical to the original Order.

Name of Stenographer : A.S.Kodgire
Dictated on : 01.07.2019
Checked on : 01.07.2019
Signed on : 01.07.2019
Uploaded on : 01.07.2019